
# ७. आपणच सोडवू आपले प्रश्न

**सांगा पाहू !**

खालील चित्रांतून तुम्हांला कोणत्या समस्या दिसून येतात?




## सार्वजनिक समस्या

आपल्या समूहजीवनात विविध समस्या असतात. या समस्यांमुळे आपली गैरसोय होते. कधीकधी आपले समूहजीवन विस्कळीत होते. समस्यांकडे डोळेझाक केल्यास त्या अधिक तीव्र बनतात, म्हणून वेळच्यावेळी समस्यांचे निराकरण करावे. आपल्या गावातील किंवा शहरातील लोकांना ज्या अडचणी येतात किंवा जे प्रश्न भेडसावतात त्यांना सार्वजनिक समस्या म्हणता येईल. परिसरातील समस्या ओळखणे, हीसुद्धा एक महत्त्वाची गोष्ट आहे. सार्वजनिक समस्या एकटी व्यक्ती सोडवू शकत नाही. त्या सर्वांच्या प्रयत्नाने आणि सर्वांच्या सहभागातून सुटू शकतात.

## तंटा निवारण

आपल्या गावात किंवा शहरात वेगवेगळ्या कारणावरून होणारे तंटे हीसुद्धा एक समस्या होऊ शकते. सतत होणाऱ्या तंट्यांमुळे गावाचे स्वास्थ्य बिघडते. एकोपा राहत नाही. गावाच्या प्रगतीत अडथळे निर्माण होतात. तंट्याचे स्वरूप गंभीर नसले; तर परस्परांशी बोलून ते सोडवता येतात; परंतु त्या मार्गाने तंटे सुटले नाहीत, तर तंटा निवारणासाठी असणाऱ्या संस्थांची आणि न्यायालयाची मदत घ्यावी लागते.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

आपल्या राज्यात २००७ पासून 'महात्मा गांधी तंटामुक्त गाव योजना' राबवण्यात आली आहे. गावातील तंटे गावातच सोडवले जावे, गावकऱ्यांनी ते चर्चेने व सामंजस्याने सोडवावे हा या योजनेचा हेतू आहे. या मार्गाने तंटे सोडवल्यास गावातील एकोपा वाढतो. ज्या गावांनी या पद्धतीने तंटे सोडवले आहेत, अशा गावांना शांतता पुरस्कारही मिळतो. शहरातील मोहल्ला समित्या तंटानिवारणाला मदत करतात.

## समस्या निवारण

**समस्या निवारणाचे हे प्रयत्न तुम्हांला माहीत आहेत का ?**

**हिवरे बाजार** : अहमदनगर जिल्ह्यातील हिवरे बाजार या लहान गावात पाण्याची मोठी समस्या होती. त्या गावातील लोकांच्या मदतीने व त्यांच्या सहभागातून ही समस्या सोडवली गेली. जनावरांच्या चाऱ्याचाही प्रश्न सुटला. आज हिवरे बाजार या गावाचा परिसर हिरवागर्द आहे.

- अनेक गावांत पाण्याची टंचाई असते. त्याची कारणे शोधा व उपाय सुचवा.

**श्रमदानातून ग्रामसफाई :** उस्मानाबाद जिल्ह्यातील खुदावाडी या गावातील लोकांनी श्रमदानातून ग्रामसफाई केली. गावाची स्वच्छता गावातील सर्वांनी मिळून करायची, हे गावकऱ्यांनी ठरवले. त्यासाठी प्रथम सांडपाण्याचे नियोजन केले. उकिरड्यावरील कचऱ्याचा वापर करून गांडूळखत तयार केले. प्रत्येक घरासाठी स्वच्छतागृह बांधले.

संत गाडगेबाबांनी कीर्तनातून गावाला स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले. स्वच्छता, शिक्षण व स्वावलंबन यांच्याशिवाय आपली प्रगती होणार नाही, असे संत गाडगेबाबा लोकांना सांगत. स्वच्छता कशी करावी हे प्रत्यक्ष कृतीतून ते दाखवून देत.

राष्ट्रसंत तुकडोजीमहाराज यांनीही ग्रामगीतेतून स्वच्छतेचे महत्त्व पुढीलप्रमाणे सांगितले आहे –

'मिळोनी करावी ग्रामसफाई ।
नाली, मोरी ठायीठायी ।
हस्ते परहस्ते साफ सर्वहि ।
चहूकडे मार्ग ।'



संत गाडगेबाबा



राष्ट्रसंत तुकडोजीमहाराज

- वर्तमानपत्रांत श्रमदानाच्या अनेक बातम्या येतात, त्यांचे संकलन करा. श्रमदानातून काय काय साध्य होते याची चर्चा करा.

### सांगा पाहू !



(१) शाळेत शांततादूतांचा गट असावा, असे तुम्हांला वाटते का?
(२) या गटातील विद्यार्थी व विद्यार्थिनींची निवड करण्यासाठी तुम्ही कोणते निकष ठरवाल?
(३) शांततादूतांसाठी नियमावली तयार करताना त्यात कोणते नियम समाविष्ट कराल?
(४) तुमच्यातील वाद मिटवण्यासाठी शांततादूत कोणकोणत्या मार्गांचा अवलंब करतात?
(५) शांततेच्या मार्गाने प्रश्न सुटतात, हे तुम्हांला कसे समजले?

शांततेसाठी समाजातील सर्व घटकांच्या मूलभूत गरजांची पूर्तता होणे आवश्यक आहे. प्रत्येकास आवश्यक ती सुरक्षितता मिळाली पाहिजे. समाजातील शोषण थांबले पाहिजे. विषमता कमी झाली पाहिजे. सार्वजनिक जीवनात सहभागी होण्याची संधी प्रत्येकाला मिळाली पाहिजे. शांततेचे महत्त्व समजावून घेणे, शांततेचे मार्ग प्रत्यक्षात वापरणे या मार्गांनी आपण कुटुंबात, शाळेत आणि सार्वजनिक जीवनात शांततेला पूरक वातावरण निर्माण करू शकतो.

### माहीत आहे का तुम्हांला ?



जगात शांतता नांदावी आणि सर्वच देशांना आपल्या जनतेच्या विकासासाठी प्रयत्न करता यावेत, म्हणून २१ सप्टेंबर हा दिवस संयुक्त राष्ट्रांतर्फे 'आंतरराष्ट्रीय शांतता दिन' म्हणून जगभर साजरा केला जातो. या दिवशी संयुक्त राष्ट्रांचे मुख्यालय असलेल्या न्यूयॉर्क शहरात, स्थानिक वेळेनुसार सकाळी १० वाजता घंटा वाजवली जाते. त्यानंतर काही क्षण शांतता पाळली जाते. सुमारे ६० देशांतील लोकांनी दिलेल्या नाण्यांपासून ही घंटा तयार करण्यात आली आहे.

तुम्हांला याबाबत आणखी माहिती हवी असेल, तर या संकेतस्थळाला भेट द्या.
http://www.internationaldayofpeace.org.

## हे नेहमी लक्षात ठेवा.



कुटुंबात, शाळेत, समाजात शांतता असेल, तर तिचा फायदा सर्वांनाच होतो. शांततेमुळे प्रगतीस हातभार लागतो. व्यापार, उद्योग, शिक्षण, कला, साहित्य, मनोरंजन, विज्ञान, तंत्रज्ञान, संशोधन इत्यादी क्षेत्रांत भरभराट करण्याची संधी मिळते. या दृष्टीने शांतता ही आपली वैयक्तिक गरज न राहता ते एक सामाजिक मूल्य बनते.

## आपण काय शिकलो ?



- समूहजीवनातील समस्या सोडवण्याची जबाबदारी सर्वांची आहे.
- सर्वांनी सहकार्य केल्यास समस्यांचे निराकरण होते.
- संवाद आणि चर्चेतून तंटा निवारण होते.
- शांततेच्या मार्गाने समस्या सोडवता येतात.
- कुटुंबात, शाळेत व समाजात शांतता असेल, तर तिचा फायदा सर्वांना मिळतो.
- शांतता हे एक सामाजिक मूल्य आहे.

## स्वाध्याय

**१. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) समस्यांकडे डोळेझाक केल्यावर त्या अधिक .................. बनतात.

(आ) परिसरातील ..................ओळखणे, हीसुद्धा एक महत्त्वाची गोष्ट आहे.

**२. पुढील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) सार्वजनिक समस्या म्हणजे काय ?

(आ) सार्वजनिक समस्या कशा सुटू शकतात ?

(इ) स्वच्छतेचे महत्त्व कोणत्या संतांनी पटवून दिले ?

**३. पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

(अ) 'श्रमदानातून ग्रामसफाई' ही संकल्पना स्पष्ट करा.

(आ) शांततेला पूरक वातावरण कसे निर्माण करता येईल ?

**४. पुढील प्रसंगी तुम्ही काय कराल ?**

(अ) वर्गप्रमुखाला वर्गात शांतता निर्माण करायची आहे.

(आ) गणित विषयाचे शिक्षक काही अपरिहार्य कारणास्तव आज वर्गात येऊ शकत नाहीत.

(इ) क्रीडांगणावर खेळाच्या सामन्याच्या वेळी दोन संघांमध्ये वाद निर्माण झाला आहे.

**उपक्रम**

१. तुमच्या परिसरातील कचऱ्याच्या समस्येबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींना पत्र द्या व त्यांच्याशी याबाबत समक्ष चर्चा करा.

२. तुमच्या परिसरात मोकाट कुत्र्यांचा त्रास होत असेल, तर त्याविषयी कोणाला कळवायचे हे शोधा. मोकाट कुत्र्यांची समस्या सोडवण्याच्या उपायांविषयी माहिती मिळवा.

* * *

5TYJ7X